जेष्ठ नागरीक समन्वय समितीच्यावतीने आरोग्य शिबीर संपन्न >> पान 2

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार आता सर्व जिल्हाधिकारी कार्यालयात मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष >> पान 3

महसूल क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाचा जिल्हाधिकारी यांचे हस्ते शुभारंभ >> पान 4

दैनिक
# आपला विदर्भ

**सुविचार**

अनुभवी माणसाचे सल्ले नेहमी मोलाचे असतात.

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 164 ■ शनिवार, दि. 25 जानेवारी 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006



विकी कौशलच्या 'छावा' चित्रपटाला शिवप्रेमींचा विरोध, शंभूराजे अन् येसूबाईंच्या 'या' सीनमुळे वाद पेटला

आतील पान

# आयुध निर्माण कंपनीच्या स्फोटात आठ लोकांचा मृत्यू पाच जखमी

## आणखी अडीच टन आरडीएक्स ढिगाऱ्यात दाबला आहे



दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** आयुध निर्माण कंपनीतील सी सेक्सनमध्ये स्फोट झाल्याची माहिती मिळाली आहे. भंडारा जिल्ह्याच्या जवाहर नगर येथील आयुध निर्माण कंपनीतील सी सेक्सनमध्ये भीषण स्फोट झाला. या स्फोटात आठ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती मिळाली आहे. मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. या कंपनीत दारू गोळा तयार केला जात होता.

स्फोटाची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले आहेत. जखमींना तातडीनं स्थानिक रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आलं आहे. जवाहरनगरातील आयुध निर्माण करणाऱ्या कारखान्यात हा स्फोट झाला आहे. ऑर्डिन्स फॅक्ट्रित स्फोट झाल्यानंतर परिसरात आग आणि धुराचे लोळ दूरपर्यंत दिसत होते.

हा स्फोट खूप भयानक होता. स्फोटाचा आवाज ५-७ किलोमीटर दूरवर गेल्याचं सांगितलं जात आहे. त्यावरुन स्फोटाची भीषणता किती असेल याचा अंदाज लावू शकतो. सी सेक्शनमधील २३ नंबरच्या इमारतीमध्ये हा स्फोट झाला आहे. साधारपणे ११ वाजण्याच्या सुमारास हा स्फोट झाल्याचं सांगण्यात येतंय मात्र याची माहिती उशिरा मिळाली. त्यानंतर पोलीस आणि अग्निशमन दल घटनास्थळी पोहोचण्यास थोडा उशीर झाला.



सकाळी ११ वाजता स्फोट झाला. त्यामुळे बरेच कामगार तिथे काम करत होते. त्याच वेळी हा स्फोट झाला. या स्फोटाचं कारण अद्याप समोर आलं नाही. मृतांचा आकडा आणखी वाढण्याची शक्यता आहे. ७ जण जखमी तर आठ जणांचा मृत्यू झाल्याचं सांगण्यात आलं आहे. स्फोटाचे आवाज झाल्यानं नागरिक भयभीत झाले. नेमकं काय घडलं हे बघायला बघ्यांची गर्दी या कंपनीबाहेर झाली आहे.

## अकोला आणि अमरावती जिल्हा हे बांग्लादेशींना बोगस नागरिकत्व प्रमाणपत्र मिळण्याचे मुख्य केंद्र- किरीट सोमय्या



दैनिक आपला विदर्भ

**अकोला/प्रतिनिधी :** अकोला आणि अमरावती जिल्हा हे बांग्लादेशींना बोगस नागरिकत्व प्रमाणपत्र मिळण्याचे केंद्र झाल्याचा आरोप भाजपानेते आणि माजी खासदार किरीट सोमय्यांनी केलाय. ते अकोला येथे बोलत होतेय. किरीट सोमय्यांनी आज अकोल्याचे जिल्हाधिकारी अजित कुंभार यांची भेट घोतलीय. अकोला जिल्हाधिकारी कार्यालयात ही भेट झालीय. अकोला जिल्ह्यातील सातही तालूक्यात १५ हजार ८४५ बांग्लादेशींना नागरिकत्व प्रमाणपत्र दिल्याचा सोमय्या यांनी गंभीर आरोप केलाय. याआधी किरीट सोमय्या यांनी मुख्यमंत्री देवेद्र फडणवीसांकडे अमरावती, भिवंडी आणि मालेगावात बांग्लादेशींना नागरिकत्व प्रमाणपत्र दिल्याचा आरोप केला होताय. अमरावती नाशिक, नागपूर, यवतमाळ आणि अकोला जिल्ह्यात बांग्लादेशी आणि रोहिंग्या मुस्लिमांना तहसील कार्यालयांतून मोठ्या प्रमाणात बनावट जन्म दाखले दिल्याचा गंभीर आरोप त्यांनी केलाय. याचसंदर्भात आज सोमय्या यांनी घेतली नागपूर, यवतमाळ आणि अकोला जिल्हाधिकार्यांची भेट घेतलीय. महाविकास आघाडीने विधानसभेत वोट जिहादसाठी हे घडवून आणण्याचा आरोप त्यांनी केला आहे...!

## ठाण्यात बर्ड फ्ल्यूचा कहर; चिकन, मटणाची दुकानं बंद ठेवण्याचे प्रशासनाचे आदेश

**ठाणे/प्रतिनिधी :** ठाण्यातील कोपरी परिसरातही बर्ड फ्लूचा शिरकाव झाल्यानं प्रशासनाची डोकेदुखी वाढलीय. कोपरी परिसरात देशी प्रजातीतील कोंबडी आणि टर्की कोंबडी यांचा १४ जानेवारीला मृत्यू झाला. कोंबड्यांचा मृत्यू बर्ड फ्लूनं झाल्याचा अहवाल राज्य शासनाच्या पशुसंवर्धन विभागाकडून ठाणे महापालिकेला प्राप्त झाल्यानंतर खळबळ उडाली. त्यामुळं कोपरी परिसरात सुरक्षेचा उपाय म्हणून इथली चिकन आणि मटणाची दुकानं पुढील आदेश येईपर्यंत बंद ठेवण्याचे आदेश पालिका प्रशासनाकडून देण्यात आले आहेत.

शासकीय निवासस्थानात पाळलेल्या कोंबड्यांना बर्ड फ्लूची लागण : ठाण्याचे पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांच्या शासकीय निवासस्थानात पाळलेल्या कोंबड्यांना बर्ड फ्लूची लागण झाल्यानं खळबळ उडाली. या रोगाचा प्रसार जिल्ह्यात इतर ठिकाणी होऊ नये, म्हणून जिल्हा प्रशासनानं मोठं पाऊल उचललं आहे. जिल्हा प्रशासनानं सुरक्षेची खबरदारी म्हणून तत्काळ ठाण्यातील या परिसरात बर्ड फ्लूची लागण होऊ नये, म्हणून उपाययोजना आखल्या आहेत.

## अकोल्याच्या सावरखेडच्या कार अपघातात नवा ट्विस्ट; पैशाचा पाऊस पाडण्याचे आमिष दाखवणाऱ्या टोळीचा सहभाग?

**मुंबई/प्रतिनिधी :** अकोला जिल्ह्यातील सावरखेड गावाजवळ २३ जानेवारीच्या रात्री कार दरीत कोसळून एकाचा मृत्यू झाल्याची घटना घडली होती. तर या अपघातानंतर ही गाडी जळालेल्या अवस्थेत दिसून आली होती. या प्रकरणात आता नवा ट्विस्ट येण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. कारण आधी सावरखेड गावात गुरे चोरण्यासाठी आलेल्या एका गाडीचा गावकऱ्यांनी पाठलाग केला होता. यात संशयितांची गाडी अनियंत्रित झाली आणि ती गाडी दरीत कोसळल्याचं पोलिसांकडून सांगण्यात आलं होतं. यात वाशिम जिल्ह्यातील कारंजा येथील रहेमत खान हमीद खान याचा मृत्यू झाला होता. या गाडीत तीनजण असल्याचं सांगण्यात आलं होतं. मात्र, मृतकासोबत गाडीत असलेल्या शेख वसिमोद्दीन याच्या पोलीस जबाबातून या गाडीत एका डॉक्टरसह एक महिला आणि इतर पाचजण असल्याचे समोर आलंय.

## तुम्ही राज्यभर पक्षाचे बळ दाखवा, मगच स्वबळाचा निर्णय घेऊ, उद्धव ठाकरेंच्या जिल्हाप्रमुखांना सूचना

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** तुम्ही राज्यभर आपल्या पक्षाचे बळ दाखवा, मग स्वबळाचा निर्णय घेऊ अशा सूचना शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी जिल्हाप्रमुखांना दिल्या. मुंबईतील शिवसेना मेळाव्यात स्वबळाचे संकेत दिल्यानंतर उद्धव ठाकरे ॲक्शन मोडमध्ये आले आहेत. उद्धव ठाकरे यांनी आज राज्यातील सर्वच जिल्हाप्रमुख आणि संपर्क प्रमुखांची बैठक घेतली. त्यामध्ये ते बोलत होते.



पक्ष वाढीसाठी ग्रामीण भागात नेतृत्व तयार करुन त्यांना अधिकार देणे गरजेचे आहे. मुंबईतून राज्यभरात जाणाऱ्या संपर्कप्रमुखांचा अवाजवी हस्तक्षेप कमी करून स्थानिक नेतृत्वाला अधिक सक्षम करणे गरजेचे असल्याचे मत अनेक नेत्यांनी या बैठकीत बोलून दाखवले. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर घडामोडींना वेग आला आहे. शिवसेना ठाकरे गटाने तयारीला सुरुवात केल्याची चर्चा आहे. याच पार्श्वभूमीवरउद्धव ठाकरे आज राज्यातील सर्व जिल्हाप्रमुख आणि संपर्कप्रमुखांची बैठक घेतली. उद्धव ठाकरे यांनी आज सर्वांना मार्गदर्शन केले, तसेच पुढील रणनितीबाबत काही सूचना देखील केल्या आहेत.

२५ जानेवारीला रात्री आठ वाजता भारत माता संविधान पूजन केले जाणार : राऊत

२६ जानेवारी च्या पूर्वसंध्येला २५ जानेवारीला रात्री आठ वाजता भारत माता संविधान पूजन केले जाईल आणि मिरवणूक काढली जाणार असल्याचे खासदार संजय राऊत म्हणाले. तालुकास्तरावर जिल्हास्तरावर मिरवणूक आणि पूजन केले जाईल असेही ते म्हणाले. उद्या शिवसेना भवन येथे उद्धव ठाकरे रात्री आठ वाजता संविधान आणि भारत माता पूजन करणार आहेत. संविधान भारत माता धोक्यात आहे. आपण त्याचे रक्षण करत आहोत आणि त्यामुळे संविधान आणि भारत मातेचे पूजन हे प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला केला जाईल असे राऊत म्हणाले. आज आढावा आणि संघटनात्मक बैठक होती असे राऊत म्हणाले.

शिवसेनेच्या स्वबळाची चर्चा का करता? असा सवाल देखील भास्कर जाधव यांनी उपस्थित केला. ज्या भाजपचे सरकार राज्यात आहे त्या भाजपने त्यांच्या मित्राला धक्का देऊन स्वबळाची तयारी केली होती. थोडे आमदार कमी पडले नाहीतर मित्रांना धोबीपछाड करून दाखवले असते असे जाधव म्हणाले. पण शिवसेना वाढली पाहिजे असे शिवसैनिकांना वाटत आहे असेही भास्कर जाधव म्हणाले. बाळसाहेब ठाकरे यांनी अनेक संकटे उधळून लावली. संकटाना नेस्तनाबूत करून शिवसेना उभी केल्याचे भास्कर जाधव म्हणाले. आज त्यांचे चिरंजीव उद्धव ठाकरे यांनी शिवसेना संपवली असे विरोधकांना वाटत असेल पण ही बाळासाहेबांची शिवसेना आहे आणि त्यांचे विचार सर्व शिवसैनिकांच्या नसांत भिनवूया असे भास्कर जाधव म्हणाले.

## कॅन्सरग्रस्त मुलीच्या देखभालीसाठी ठेवलेल्या नेपाळी नर्सचाच घरातल्या तिजोरीवर डल्ला; लाखोंचा मुद्देमाल केला लंपास

**मुंबई/प्रतिनिधी :** घाटकोपरमधून एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. यात कॅन्सरग्रस्त मुलीच्या देखभालीसाठी ठेवलेल्या नेपाळी नर्सनेच घरातल्या तिजोरीवर डल्ला मारल्याची घटना घडली आहे. यात नेपाळी महिला आरोपीने घरातून तब्बल ५ लाख ९२ हजार किंमतीची मालमत्ता आणि ३ लाख ५० हजारांची रोख आणि सोन्याचे दागिने घेऊन पसार झाली आहे. मात्र घाटकोपर पोलिसांनी मोठ्या शिताफीने आरोपी महिलेला ॲन्टॉप हिलच्या प्रतिक्षानगरमधून अटक केली आहे. पुढे आलेल्या माहितीनुसार, सावित्री कमल थापा(वय वर्ष २६) असे या महिलेचे नाव आहे. नवी मुंबईच्या पनवेल येथील विचुंबे गावात ही वास्तव्याला होती. दरम्यान ही घटना घडली असून सर्वत्र एकच खळबळ उडाली आहे. एकीकडे सैफ अली खानवर हल्ला करणारा आरोपी बांग्लादेशी असल्याची घटना ताजी असतानाच घाटकोपर पोलिसांनी चोरीच्या गुन्ह्यात एका नेपाळ स्थित महिलेला चोरीच्या गुन्ह्यात अटक केल्याने बांगलादेशी घुसखोरांचा मुद्दा चर्चेत आला आहे.

## शेतकऱ्यांना १०,००० रुपये मिळणार? मोदी सरकारचा प्लॅन नेमका आहे तरी काय?

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** १ फेब्रुवारी २०२५ रोजी सादर होणाऱ्या केंद्रीय अर्थसंकल्पाकडून सर्वांना खूप अपेक्षा आहेत. सरकार विशेषत: शेतकऱ्यांसाठी कोणत्या घोषणा करणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. यावेळी अर्थसंकल्पात पंतप्रधान किसान सन्मान निधीचा हप्ता वाढू शकेल अशी शेतकऱ्यांना आशा आहे. सध्या, पंतप्रधान किसान सन्मान निधी अंतर्गत शेतकऱ्यांना दरवर्षी ६,००० रुपये मिळतात. शेतकऱ्यांना आशा आहे की हे पैसे ६,००० रुपयांवरून १०,००० रुपये होतील. सरकार ही घोषणा अर्थसंकल्पात करू शकते.

शेतकऱ्यांना काय भेट देणार?

हे बजेट मोदी सरकारच्या तिसऱ्या कार्यकाळातील पहिले पूर्ण बजेट असेल. यामुळेच शेतकरी अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांच्या संभाव्य घोषणांवर लक्ष ठेवून आहेत.

पैसे उभे करण्याची गरज का पडली?



शेतकरी आणि तज्ञांचे असे म्हणणे आहे की, महागाई आणि वाढत्या शेती खर्चामुळे ६,००० रुपयांची मदत पुरेशी नाही. जास्त पैसे मिळवून, शेतकरी शेतीत चांगली गुंतवणूक करू शकतील. तसेच, हे पाऊल ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत करेल. सरकार ही रक्कम १०,००० रुपयांपर्यंत वाढवण्याचा विचार करत आहे, परंतु अद्याप कोणताही ठोस निर्णय झालेला नाही.

जर २०२५ च्या अर्थसंकल्पात पीएम-किसान योजनेची रक्कम वाढवण्याची घोषणा झाली तर लाखो शेतकऱ्यांसाठी तो मोठा दिलासा ठरेल. अधिक आर्थिक मदतीमुळे शेतकऱ्यांना त्यांच्या शेतीविषयक कामांमध्ये मदत होईल आणि ते त्यांची आर्थिक स्थिती सुधारू शकेल.

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना १ डिसेंबर २०१८ रोजी सुरू करण्यात आली. लहान आणि सीमांत शेतकऱ्यांना आर्थिक मदत देणे हे त्याचे उद्दिष्ट आहे. या योजनेअंतर्गत, शेतकऱ्यांना दरवर्षी तीन हप्त्यांमध्ये ६,००० रुपये दिले जातात. हे पैसे थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात हस्तांतरित केले जातात. आतापर्यंत सरकारने या योजनेअंतर्गत १८ हप्ते जारी केले आहेत. १९ वा हप्ता येत्या फेब्रुवारीमध्ये अपेक्षित आहे.

# महाराष्ट्राच्या कन्येची उत्तुंग झेप; कर्तव्यपथावर बीडच्या कन्या फ्लाईट लेफ्टनंट दामिनी देशमुख करणार वायुसेनेच्या तुकडीचे नेतृत्व

नवी दिल्ली : दरवर्षी कर्तव्यपथावरील प्रजासत्ताक दिनाच्या मुख्य सोहळ्यात विविध विभागांच्या तुकड्या पथसंचलन करतात. यंदा यामध्ये भारतीय वायुसेनेच्या तुकडीचे नेत्,त्व बीडच्या कन्या फ्लाईट लेफ्टनंट दामिनी देशमुख 'परेड कमांडर' म्हणून करणार आहेत. गेल्या काही दिवसांपासून बीड जिल्हा वेगवेगळ्या गोष्टींसाठी चर्चेत आहे. त्या पार्श्वभुमीवर बीडसह महाराष्ट्राला सुखद आणि अभिमानास्पद वाटणारी ही बाब आहे.

देशात प्रजासत्ताक दिनाचा मुख्य सोहळा दरवर्षी राजधानीत कर्तव्यपथावर होतो. या कार्यक्रमाला राष्ट्रपती, पंतप्रधानांसह विशेष अतिथी उपस्थित असतात. या दिमाखदार सोहळ्याला संबंध देश आणि जग बघतो. भारताच्या सामर्थ्याचे आणि महान संस्कृतीचे दर्शन कर्तव्यपथावरील पथसंचलनातून होते. यामध्ये भारतीय वायू सेनेची तुकडी देखील असते. यंदा वायुसेनेच्या १४४ जणांच्या तुकडीचे नेतृत्व ४ अधिकारी 'परेड कमांडर' म्हणून करणार आहेत, त्यापैकी फ्लाईट लेफ्टनंट दामिनी देशमुख एक आहेत.

**बीड, पुणे ते दिल्ली... दामिनी देशमुखांचा प्रेरणादायी प्रवास**

भारतीय वायू सेनेत फ्लाईट लेफ्टनंट म्हणून कार्यरत असलेल्या दामिनी देशमुख मुळच्या बीड जिल्ह्यातील वडवणी तालुक्यातील देवडी गावच्या आहेत. दामिनी देशमुख यांचे वडील निवृत्त न्यायमुर्ती दिलीप देशमुख पुणे विभागाचे माजी सह धर्मादाय आयुक्त आहेत

दामिनी देशमुख यांनी ५ वी ते १२ वी पर्यतचे शिक्षण राणी लक्ष्मीबाई सैनिकी विद्यालय पुणे येथून पूर्ण केले. पुढे पुण्यातूनच यांत्रिकी अभियांत्रिकीची पदवी मिळवली आणि भारतीय वायुसेनेची कॉमन ॲडमिशन टेस्ट ही परीक्षा दिली. त्यामध्ये विविध पायऱ्या पूर्ण करून २०१९ ला दामिनी देशमुख यांची वायुसेनेत फ्लाईंग ऑफिसर म्हणून निवड झाली. त्यावेळी देशातील केवळ११९ विद्यार्थी निवड या परीक्षेत झाली होती.



वायुसेनेत निवड झाल्यानंतर हैद्राबाद येथे १ वर्ष प्रशिक्षण पूर्ण केले. त्यानंतर त्यांना हरियाणामधील सिरसा येथे फ्लाईंग ऑफिसर म्हणून नियुक्ती दिली गेली. २ वर्षांनी त्यांना बढती मिळाली आणि फ्लाईट लेफ्टनंटपदी त्यांची निवड करण्यात आली. सध्या उत्तर प्रदेशातील कानपूरमध्ये त्या कार्यरत आहेत. दामिनी देशमुखांनी अश्वारोहन, कराटे, योगा, रायफल शूटिंग, तसेच खो-खो आणि व्हॉलीबॉलमध्येही प्राविण्य मिळवले आहे. कराटेमध्ये त्यांना ब्लॅकबेल्ट प्राप्त झाला आहे.

गेल्या २ महिन्यांपासून भारतीय वायू सेनेच्या तुकडीच्या १४४ जणांची तुकडी दिल्लीत पथसंचलनासाठी सराव करत आहे. या कठोर सरावातून तुकडीचे नेतृत्व करण्यासाठी ४ जणांची निवड झाली. त्यापैकी दामिनी देशमुख एक आहेत.

**दिलीप देशमुख, दामिनी देशमुख यांच्या वडीलांची प्रतिक्रिया**

आमच्या मुलीचा आम्हाला अभिमान आहे. भारतीय वायुसेनेत मोठ्या पदावर जावे, हे दामिनीचे स्वप्न होते. तिने ते स्वप्न पूर्ण करण्यासाठी अथक परिश्रम केले. सुरुवातीच्या एक दोन प्रयत्नांमध्ये यश मिळाले नाही तेव्हा आम्ही अन्य परीक्षांबद्दल तिला सुचवले. मात्र ती तिच्या निश्चयावर आणि ध्येयावर ठाम होती. अखेर तिने भारतीय वायुसेनेत अधिकारी होण्याचे स्वप्न पूर्ण केले. मुलगी म्हणून तिचा आम्हाला अभिमान आहेच. राजधानी दिल्लीतील कर्तव्यपथावर ती भारतीय वायुसेनेच्या तुकडीचे नेतृत्व करणार आहे, ही आमच्या कुटुंबासाठी, आमच्या बीड जिल्ह्यासाठी आणि महाराष्ट्रासाठीही आनंदाची, अभिमानाची गोष्ट आहे.

# जेष्ठ नागरीक समन्वय समितीच्यावतीने आरोग्य शिबीर संपन्न

## शासकीय योजना व सुविधेचा लाभ जेष्ठानी घ्यावा- जिल्हाधिकारी

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी** : राज्य व केंद्र शासनामार्फत जेष्ठ नागरिकांसाठी विविध आरोग्य सुविधा व योजना सुरू केल्या आहेत. तसेच जिल्हा सामान्य रुग्णालयातील जेष्ठासाठी आरोग्य सुविधा उपलब्ध करुन दिल्या आहे. या सुविधा व योजनांचा लाभ जेष्ठ नागरिकांनी करून घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

जिल्हा सामान्य रुग्णालय, ज्येष्ठ नागरिक समन्वय समिती व ज्येष्ठ नागरिक प्रतिष्ठान नागपूर यांच्यावतीने आयोजित आरोग्य शिबिराचे उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. भागवत भुसारी, सहाय्यक आयुक्त समाज कल्याण भाऊराव चव्हाण, जेष्ठ नागरिक प्रतिष्ठान नागपूरचे सचिव डॉ. राजीव मिश्रा, डॉ. सुरेश छाजेड, डॉ. वसंतराव चिंचोले, डॉ. लक्ष्मणराव खर्चे, ज्येष्ठ नागरिक समन्वय समितीचे मधुसूदन कुलकर्णी, तेजराव सावळे आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ. पाटील म्हणाले की, मानसिक आजाराच्या माध्यमातून एकलेपणाची, नैराश्याची भावना निर्माण होते. यातून स्मृतीभंश, अल्झायमर सारखे आजार जेष्ठ नागरिकांना होऊ शकतात. यातून बाहेर पडण्यासाठी मेडिटेशन, विपश्यना, योगाभ्यास करणे आवश्यक आहे. ज्येष्ठ नागरिकांनी आपल्या कुटुंबातील मुलाबाळांमधे फारसे अडकुन न पडता, आवडत असलेल्या क्षेत्रात गुंतवून ठेवावे. अध्यात्मिक क्षेत्र, कलागुण वाचन यासारख्या विविध गोष्टींमध्ये गुंतून ठेवावे. चालणे, फिरणे यासारख्या क्रियाशील बाबी रोज नियमितपणे करावे, असेही त्यांनी यावेळी सांगितले. जिल्हा सामान्य रुग्णालय ज्येष्ठ नागरिकांसाठी सुरू करण्यात आलेल्या बाह्य रुग्ण कक्षाचे उद्घाटन जिल्हाधिकारी यांच्या हस्ते करण्यात आले.

जिल्हा सामान्य रुग्णालयात ज्येष्ठ नागरिकांसाठी बाह्य रुग्ण विभागासोबतच आंतररुग्ण विभागही सुरू करण्यात येणार आहे. या सर्व सुविधांचा ज्येष्ठ नागरिकांनी फायदा घ्यावा, असे आवाहन जिल्हा जिल्हा शल्यचिकित्सक



डॉ. भागवत भुसारी यांनी केले. शिबीरामध्ये ३०० पेक्षा जास्त ज्येष्ठ नागरिकांनी आपली आरोग्य तपासणी डॉ. ऋषिकेश निकम, डॉ. रवी शिंदे यांनी केली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक भरत जाधव यांनी केले. सूत्रसंचालन अंजली परांजपे यांनी तर आभार प्रदर्शन मधुसुधन कुळकर्णी यांनी केले.

०००००० 

## राष्ट्रीय मतदार दिन

स्वातंत्र्य दिन आणि प्रजासत्ताक दिन हे दोन आपले राष्ट्रीय सण आहेत हे आपणा सर्वांना माहीतच आहे या दिवशी देशभक्ती ओसंडून वाहत असते पण या दिवसा इतकाच आजचा दिवसही तितकाच म्हत्वाचा आहे हे अनेक लोकांना माहीत नाही. आज २५ जानेवारी आज राष्ट्रीय मतदार दिन.आजच्याच दिवशी भारतीय लोकशाहीचा पाया रचला गेला. आजच्याच दिवशी म्हणजे २५ जानेवारी १९५० रोजी भारत निवडणूक आयोगाची स्थापना झाली म्हणून हा दिवस संपूर्ण देशात राष्ट्रीय मतदार दिवस म्हणून साजरा केला जातो. भारतीय लोकशाहीने प्रत्येक सुजाण नागरिकाला मतदानाचा मूलभूत हक्क बहाल केला आहे. त्यामुळे मतदार यादीत नाव नोंदवून प्रत्येक नागरिकांनी निवडणुकीत आपले मतदान नोंदवून लोकशाही बळकट करावी असा उद्देश या दिवसामागे आहे. म्हणून या दिवशी भारत निवडणूक आयोग विविध कार्यक्रमांचे आयोजन करुन मतदानासंदर्भात जनजागृती करते. या दिवशी १८ वर्ष पूर्ण झालेल्या नवीन मतदारांची नोंद करून त्यांना भारत निवडणूक आयोगाचे ओळखपत्र दिले जाते. मतदान हे प्रत्येक सुजाण नागरिकांचे राष्ट्रीय कर्तव्य आहे. १८ वर्ष पूर्ण झालेल्या प्रत्येक नागरिकांना संविधानाच्या अनुच्छेद ३२६ नुसार मतदानाचा हक्क दिला आहे. मतदान करणे ही देखील देशसेवाच आहे. त्यामुळे जास्तीतजास्त लोकांनी मतदान करुन भारतीय लोकशाहीला बळकट करायला हवे मात्र आपल्या देशात आजही मतदार मतदानाबाबत गंभीर आहेत असे दिसत नाही. घटनाकारांनी मतदानाचा अधिकार बहाल करून देशवासियांना खूप मोठे अस्त्र दिले आहे पण दुर्दैवाने आजही लोकांना त्याचे महत्व नाही म्हणूनच आपल्या देशात कोणत्याही निवडणुकीत ६० टक्क्यांपेक्षा अधिक मतदान होत नाही याचाच अर्थ देशातील ४० टक्के मतदार मतदान करित नाहीत. भारतीय मतदारांचा मतदानाबाबतचा हा निरुत्साह लोकशाहीला मारक आहे. विशेष म्हणजे सुशिक्षित वर्गातच मतदानाविषयी निरुत्साह दिसून येतो. मतदानादिवशी राष्ट्रीय सुट्टी असते या दिवशी मतदान करण्याऐवजी सहकुटुंब सहलीला जाण्याचा ट्रेंड सुशिक्षित वर्गात दिसून येतो आपण एकट्याने मतदान केले नाही तर काय फरक पडणार असाच आविर्भाव या लोकांमध्ये दिसून येतो. जे मतदान करतात त्यातील काही लोक मतदान करण्याऐवजी आपल्या मताची विक्री करतात. रोटी, बोटी, आणि चपटीसाठी काही जण आपले मत अक्षरशः विकतात. अर्थात सर्वचजण असे करतात असे नाही. बहुतेक जण विचार करुन आपल्या देशासाठी, समाजासाठी योग्य अशा उमेदवाराला मतदान करतात हे ही नाकारून चालणार नाही अशा लोकांची संख्या वाढली पाहिजे. लक्ष्मी दर्शन झाल्यानंतरच मतदान करणारे लोक बाबासाहेबांनी दिलेल्या या अस्त्राचा दुरुपयोग करतात. या लोकांमुळेच लोकशाही कलंकित होत आहे. बाबासाहेबांनी हे अस्त्र आपल्या हाती देण्यासाठी किती कष्ट सोसले याचीही जाणीव या लोकांना नाही. संविधानात मतदानाचा मूलभूत हक्क समाविष्ट करून बाबासाहेबांनी आपल्याला सर्वात मोठा हक्क मिळवून दिला आहे. आपलव हा मतदानाचा पवित्र हक्क बजावून प्रत्येकाने लोकशाही बळकट करायला हवी. प्रत्येकाने मतदानाचा हक्क जबाबदारीने बाजावल्यास देशाचे भविष्य बदलू शकते. त्यामुळे प्रत्येकाने निराशावादी भूमिका सोडून जागरूकतेने व स्वयंस्फूर्तीने प्रत्येक निवडणुकीमध्ये मतदानाचा हक्क बजावून राष्ट्रीय कार्यामध्ये आपला खारीचा वाटा उचलायला हवा. लोकशाहीचे बळकटीकरण करावयाचे असेल तर जागरुक मतदारांचा एक मोठा वर्ग अस्तित्वात येणे आवश्यक आहे. त्यामुळे आपला देश विकसनशीलतेकडून विकसित देश होण्याकडे निश्चितच मदत होईल. १८ वर्षांपुढील सर्व सुजाण नागरिकांनी आगामी निवडणुकीमध्ये मतदानाचा हक्क बजावला तरच राष्ट्रीय मतदार दिन साजरा केल्याचे सार्थक होईल.

## एसटी पाठोपाठ रिक्षा, टॅक्सीची भाडेवाढ! सर्वसामान्यांच्या खिशाला किती रुपयांचा फटका?

नवी दिल्ली : नवीन वर्षाची सुरुवात महागाईने झाली आहे. मुंबईसह महाराष्ट्रातील सर्वसामान्यांना भाडेवाढीचा झटका लागलाय. एसटी प्रवाशांच्या खिशाला कात्री लागलीय. एसटी महामंडळाचा १५म भाडेवाढीचा प्रस्ताव देण्यात आला होता यावर राज्य सरकारने शिक्कामोर्तब केलाय. शनिवारी २५ जानेवारी मध्यरात्रीपासून एसटीच्या भाडेवाढ लागू होणार आहे. गेली ३ वर्षे निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भाडेवाढ करण्यात आली नव्हती. त्यामुळे दरवर्षी ५ टक्के प्रमाणे तीन वर्षाची १५ टक्के एसटी महामंडळानं केलीय. भाडेवाढ झाल्यामुळे राज्यातील जनतेसाठी एस.टी.चा प्रवास ६० ते ८० रुपयांनी महागणार आहे. एसटीपाठोपाठ रिक्षा, टॅक्सीची भाडेवाढ करण्यात आल्यामुळे मुंबईकरांचा प्रवास महागणार आहे. नवीन वर्षात ऑटो रिक्षा, टॅक्सीच्या भाडेवाढीमुळे मुंबईकरांच्या खिशाला कात्री लागली आहे. टॅक्सीचा दर ४ प्रति किमीने तर रिक्षाचा दर ३ प्रति किमीने वाढणार आहे. त्याचप्रमाणे टॅक्सीचा दर हा २८ वरुन ३२ वर जाणार आहे, तर रिक्षाचा दर हा २३ वरुन २६ वर जाईल. रिक्षा संघटनेने वाढत्या सीएनजी भावामुळे आणि रिक्षाच्या दुरुस्तीचा खर्च वाढल्याने चालकांला भाडे परवडत नसल्याने त्यांनी भाडेवाढीची मागणी केली होती. त्यामुळे ही भाडेवाढ करण्यात आली असं परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितलंय. दरम्यान यापूर्वी २०२२ मध्ये भाडेवाढ झाली होती. तेव्हा २ रुपयांने भाडेवाढ झाली होती. रिक्षा पहिला मीटर हा २१ होता त्यावरून तो २३ रुपये झाला होता आणि टॅक्सीचा दर हा २५ रुपये होता. त्यावरून तो २८ रुपये झाला होता.

## 'छावा'मध्ये संभाजी महाराज नाचताना दाखवले, छत्रपती संभाजीराजे संतापले; म्हणाले, लिबर्टी कुठपर्यंत न्यायची...?

**मुंबई/प्रतिनिधी** : अभिनेता विक्की कौशलचा 'छावा' हा सिनेमा लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. सिनेमाचा ट्रेलर नुकताच रिलीज झाला, ज्यानंतर सिनेमाला मराठा क्रांती मोर्चाकडून विरोध दर्शवण्यात आला आहे. चित्रपटाच्या विरोधाची पहिली ठिणगी पुण्यातून पडली आहे. मराठा क्रांती मोर्चाने या चित्रपटाला विरोध केला आहे. सिनेमाच्या ट्रेलरमध्ये छत्रपती संभाजी महाराज आणि येसूबाई यांच्याबद्दल आक्षेपार्ह प्रसंग दाखवण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. यावर संभाजीराजे छत्रपती भोसले यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

संभाजीराजे यांनी म्हटलं, ''स्वराज्याचं उद्दिष्ट त्यांनी सांगितलं त्यात मला काही चुकीचं वाटलं नाही. मी त्यांना स्पष्ट सांगितलं होतं की, आमचे लोक इतिहासकार आणि जाणकार लोकांनी हे पाहणं गरजेचं आहे. मी त्यांची वाट पाहत आहे की, ते आपल्याला बोलावतील. एकदा चर्चा झाली आणि सगळं छान आहे असं दिसलं तर सगळंच छान होईल. शिवाजी महाराजांच्या माध्यमातून संभाजी महाराज देशात नाही तर जगात पोहोचतील. छत्रपती शिवाजी महाराजांनंतर हिंदवी स्वराज्य स्थापन केलं पण त्यांच्यातर ते कोणी सांभाळलं असेल तर छत्रपती संभाजी महाराज, छत्रपती राजाराम महाराज आहेत आणि छत्रपती ताराराणी म हाराणीसाहेब आहेत.''

ते पुढे म्हणाले, ''संभाजी महाराजांच्या राज्याभिषेकानंतर हा डान्स दाखवण्यात आला आहे. छत्रपती शिवाजी महाराज गेल्यानंतर सगळेच ८-९ महिन्यात असा डान्स करू शकतात का? यावर मी असं स्टेटमेंट करणं उचित नाहीये. दिग्दर्शक लक्ष्मण उतेकर हा म राठी माणूस आहे. त्यांनी मागची २-३ वर्ष या सिनेमासाठी दिली आहेत. शिवाजी महाराजांचं हिंदवी स्वराज्य कसं स्थापन झालं याची त्यांना पूर्ण कल्पना आहे. त्यांच्या भावना मी त्यादिवशी पाहिल्या. त्यामुळे मी त्यांना हेच सांगितलं की, अनेक गोष्टी त्यात असू शकतात ज्यात आपण दुरुस्ती करू शकतो. अजून वेळ हातातून गेलेली नाही. माझी त्यांना विनंती आहे. एखाद्या गोष्टीवर स्टेटमेंट करणं बरोबर नाही. कारण चांगलं काम करत असताना कोणाचे पाय ओढणं हे माझ्या तत्त्वात नाही. त्यांना सहकार्य करण्याची माझी भूमिका आहे. त्यांनी इतिहासकार, त्या विषयाची माहिती असलेल्या जाणकारांना बोलवावं, त्यांना आम्ही दुरुस्ती सांगू. त्यात आणखी काही चांगलं दुरुस्त करता येईल जेणेकरून हा सिनेमा अपेक्षेपेक्षा दुप्पट पद्धतीने जगात पोहोचू शकेल.''

## पैनगंगा नदी पात्रातून लाकडी तराफ्याच्या साहाय्याने गावकऱ्यांचा धोकादायक प्रवास



दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी** : भारताला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्ष पूर्ण झाली आहेत. परंतु अजूनही अनेक खेड्यापाड्यापर्यंत मूलभूत सुविधा पोहचल्या नाहीत. एकीकडे रस्त्यांचे जाळे देशभरात मोठ्या प्रमाणात निर्माण झाले आहे. तर दुसरीकडे अनेक गावापर्यंत धड रस्ता देखील पोहचला नाही आहे. असाच काहीसा प्रकार मराठवाडा आणि विदर्भातील अनेक गावाच्या बाबतीत घडला आहे. मागील अनेक वर्षांपासून मराठवाडा आणि विदर्भातील जवळपास २५ गावातील नागरिक पैनगंगा नदी पत्रातून एका लाकडी तराफ्याच्या साहाय्याने धोकादायक प्रवास करत आहेत. मराठवाड्यातील हदगाव आणि विदर्भातील उमरखेड या दोन्ही शहरांना ये जा करण्यासाठी जवळपास ४० किलोमीटरचा वळसा घालून जावं लागते. परंतु या नदीवरून प्रवास केल्यास फक्त ५ किलो मीटर अंतरावर हे दोन्ही तालुक्याचे ठिकाण येतात. त्यामुळे या नदीवर पूल झाल्यास या २५ गावांचा प्रश्न सुटणार आहे. तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या नदीवर पूल उभारण्यास मंजुरी दिली होती. परंतु प्रशासनाच्या हलगर्जीपणा मुळे या पुलाच्या बांधकामाचे काम रखडले आहे.ते व्हा या गावकऱ्यांना पुन्हा तराफ्याच्या साहाय्याने असा धोकादायक प्रवास करावा लागतो आहे.

## विकी कौशलच्या 'छावा' चित्रपटाला शिवप्रेमींचा विरोध, शंभूराजे अन् येसूबाईंच्या 'या' सीनमुळे वाद पेटला

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** बॉलिवूड अभिनेता विकी कौशल याच्या 'छावा' चित्रपटासम ोरच्या अडचणी वाढल्याचं दिसत आहे. या चित्रपटाच्या टीझरवरुन वाद सुरु झाला आहे. दिग्दर्शक लक्ष्मण उतेकर यांच्या छावा चित्रपटावर बंदी घालण्याची मागणी होऊ लागली आहे. शिवप्रेमींनी या चित्रपटाचा विरोध केला आहे. निर्माता दिनेश विजन याच्या आगामी छावा चित्रपटासमोर नवीन संकट उभं ठाकल्याचं दिसत आहे.

विकी कौशलचा 'छावा' वादात

विकी कौशल आणि रश्मिका मंदाना स्टारर बहुप्रतिक्षित छावा चित्रपटाचा ट्रेलर तुकताच प्रदर्शित झाला असून त्यावर शिवप्रेमींनी संताप व्यक्त केला आहे. हा चित्रपट डिसेंबर २०२४ मध्ये रिलीज होणार होता. मात्र, इतर चित्रपटांसोबत होणाऱ्या क्लॅशमुळे या चित्रपटाची रिलीज डेट पुढे ढकलण्यात आली. त्यानंतर आता हा चित्रपट १४ फ्रेबुवारी रिलीज होणार आहे. मात्र, त्यातही आता वादाची ठिणगी पडली आहे. या चित्रपटाच्या ट्रेलरवरुन शिवप्रेम ींनी याला विरोध दर्शवला आहे.

शंभूराजे अन् येसूबाई यांच्यातील 'या' सीनमुळे वाद पेटला

अभिनेता विकी कौशल आणि अभिनेत्री रश्मिका मंदाना यांच्या 'छावा' चित्रपटाच्या टिझरला शिवप्रेमींनी विरोध दर्शवला आहे. छावा चित्रपटामध्ये छत्रपती संभाजी महाराज आणि येसूबाई नाचताना दाखवले आहेत. त्यामुळे शिवप्रेमींनी या चित्रपटाचा विरोध केला आहे. महाराष्ट्रात हा चित्रपट कुठे प्रदर्शित होऊ देणार नाही, असा इशारा शिवप्रेमींनी दिला आहे.

## मुंबईत तरुणीवर बलात्कार: नराधमानं गाठली अत्याचाराची परिसीमा, गुप्तांगात घातले ब्लेड आणि दगड

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** आतापर्यंत महिला सुरक्षेच्या बाबतीत दिल्लीपेक्षा मुंबई कितीतरी पटीनं सेफ आहे, असं म्हटलं जात होतं. मात्र, आता याच्या उलट होताना दिसत आहे. मुंबईत एका रिक्षा चालकानं वीस वर्षे तरुणीवर अत्याचार केल्याची घटना घडली आहे. इतकंच नाही तर, या आरोपीनं पीडित तरुणीच्या गुप्तांगात ब्लेड आणि दगड टाकल्याचं देखील वैद्यकीय तपासात समोर आलं आहे. राजरतन वालवाल असं नराधम रिक्षा चालकाचं नाव आहे. पोलिसांनी या तरुणीची वैद्यकीय तपासणी मुंबईतील केईएम रुग्णालयात केली. त्यात ही बाब समोर आली आहे. या घटनेचा अधिक तपास झोन बाराच्या पोलीस उपायुक्त स्मिता पाटील करत आहेत.

तरुणीवर बलात्कार करुन गुप्तांगात भरले ब्लेड आणि दगडं : मिळालेल्या माहितीनुसार, एक वीस वर्षाची तरुणी रात्री उशिरा राम मंदिर स्थानकाजवळ रडताना काही लोकांनी पाहिली. तिची अवस्था पाहून तिथल्या उपस्थित नागरिकांनी तत्काळ वनराई पोलीस ठाण्यात घटनेबाबतची माहिती दिली. वनराई पोलीस ठाण्याचे कर्मचारी तिथे आले, त्यांनी या तरुणीला सोबत घेतलं. पीडिता आणि तिचं कुटुंब नालासोपारा इथं राहतात. आरोपीनं वसई बीचवर पीडीतेसोबत हे कूकृत्य केल्याची माहिती समोर येत आहे. त्यानंतर संबंधित रिक्षाचालकानं या तरुणीच्या गुप्तांगात सर्जरी ब्लेड आणि छोटे दगड भरले. या तरुणीला बेशुद्ध अवस्थेत राम मंदिर स्थानकाजवळ सोडून आरोपी रिक्षा चालक पसार झाला.

नराधमाला पोलिसांनी ठोकल्या बेड्या : दरम्यान, या घटनेचा अधिक तपास झोन बाराच्या पोलीस उपायुक्त स्मिता पाटील करत आहेत. याबाबत बोलताना त्यांनी, ''आरोपी रिक्षाचालक राजरतन वालवाल याला ताब्यात घेतलं. रिक्षाचालक राज रतन वालवाल याच्याविरुद्ध बलात्काराचा गुन्हा दाखल आला असून, या घटनेचा अधिक तपास सुरू आहे,'' अशी माहिती पोलीस उपायुक्त स्मिता पाटील यांनी दिली आहे.

## ड्रगिस्ट आणि केमिस्ट संघटनेच्यावतीने आयोजित रक्तदान शिबिरात ७० युवकांचे रक्तदान

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** अखिल भारतीय ड्रगिस्ट आणि केमिस्ट संघटनेचे अध्यक्ष जगन्नाथ शिंदे यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त मेहकर येथे आयोजित रक्तदान शिबिरात स्वतः रक्तदान करून माजी आमदार संजय रायमुलकर यांनी आपली कृतिशीलता दाखवून दिली. शिबिरात युवकांनी मोठ्या प्रमाणात रक्तदान केले.

जगन्नाथ शिंदे यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त देशभर ड्रगिष्ट आणि केमिस्ट संघटनेच्या वतीने आज रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. माजी आमदार संजय रायमुलकर यांचा ओ निगेटिव्ह हा दुर्मिळ रक्तगट असून त्यांनी शिबिराच्या प्रारंभी स्वतः रक्तदान करून सामाजिक दृष्ट्या आपले योगदान दिले. देशातील रुग्णालयांना मोठ्या प्रमाणात सर्व गटाच्या रक्ताची मोठी आवश्यकता असून रक्त उपलब्ध झाल्यास रुग्णांचे प्राण वाचू शकतात. रक्तदानाच्या अमूल्य अशा कार्यात आपलेही योगदान असावे म्हणून अखिल भारतीय ड्रगिस् आणि केमिस्ट संघटनेच्या वतीने संघटना अध्यक्षांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसाचे निमित्त साधून देशभर आज रक्तदान शिबिरांचे आयोजन केले होते. संघटनेच्या मेहकर तालुका कार्यकारीणीच्या वतीने अजंठा रुग्णालय परिसरात रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. सरपंच संघटनेचे तालुका अध्यक्ष अरुण दळवी,डॉ.निलेश गट्टाणी यांच्यासह वैद्यकीय क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते.



शिबिरात रक्तदान करतांना माजी आमदार संजय रायमुलकर



फार्मसी महाविद्यालये आणि इतर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत रक्तदान केले. नागरिकांचाही चांगला प्रतिसाद लाभला. संघटनेचे विष्णू लाहोटी, नितीन भराडे, प्रकाश दुतोंडे, ललित रहाटे, नंदूभाऊ काळे, अभिमन्यू नागोलकर ,ऋषी खिल्लारे ,एकनाथ दुधाट ,सागर खुरद ,नाकाडे ,मोसिन शेख ,डॉ. नागोलकर ,भूषण तुपकर यांच्यासह इतर पदाधिकाऱ्यांनी शिबिराच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार आता सर्व जिल्हाधिकारी कार्यालयात मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष

## वैद्यकीय मदतीसाठी स्वतंत्र ऑनलाइन प्रणाली, अर्जासाठीची प्रक्रिया पेपरलेस

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील गरजू रूग्णांना आर्थिक सहाय्य करण्याकरिता राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयात मुख्यमंत्री सहाय्यता कक्ष सुरू करण्यात येणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पहिल्या मुख्यमंत्रीपदाच्या काळात गरजूंना अत्यावश्यक आरोग्यसेवा व आर्थिक सहाय्य देण्याकरिता मंत्रालयात मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष कार्यरत करण्यात आला आहे. ही सेवा नागरिकांना त्यांच्याच जिल्ह्यात सहजपणे उपलब्ध व्हावी अशी सूचना मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी केली होती. त्यानुसार राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयात मुख्यमंत्री सहाय्यता कक्ष सुरू करण्याचा शासननिर्णय काढण्यात आला आहे.

या कक्षात सादर झालेल्या अर्जाचा पाठपुरावा करण्यासाठी रुग्ण व त्यांचे नातेवाईक मंत्रालयात येत असतात. या निर्णयामुळे नागरिकांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या प्रकरणांची माहिती त्यांच्याच जिल्ह्यात उपलब्ध होणार आहे, असे मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाचे प्रमुख रामेश्र्वर नाईक यांनी सांगितले.



मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या मार्गदर्शनानुसार मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाचे कामकाज अधिक सुलभ व पेपरलेस करण्यात येत आहे. महागड्या वैद्यकीय उपचारांसाठी गरजू आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांना आर्थिक मदत मिळविण्याची प्रक्रिया पूर्णतः पेपरलेस करण्यात येणार असून या प्रक्रियेसाठी मंत्रालयात येण्याची आवश्यकता राहणार नाही. याकरिता लवकरच स्वतंत्र ऑनलाइन प्रणाली विकसित करण्यात येणार असल्याची माहिती श्री. नाईक यांनी दिली आहे. यामुळे नागरिकांचा वेळ व खर्च टाळता येणार आहे.

मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीच्या माध्यमातून गंभीर आजारांवरील उपचारांसाठी गरजू नागरिकांना अत्यावश्यक आर्थिक मदत केली जाते. या सेवांचा मोठ्या प्रमाणावर लाभ घेणे सहज सुलभ व्हावे यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष सुरू करण्यात येणार आहे. संबंधित जिल्ह्यातील मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षास प्राप्त झालेल्या अर्जांची सद्यस्थिती नागरिकांना उपलब्ध करुन देणे व समस्यांचे निराकरण करणे, कक्षामध्ये आलेल्या रुग्णांच्या नातेवाईकांना अर्ज भरण्यास सहाय्य करणे, मुख्यमंत्री सहाय्यता निधीमधून आर्थिक मदत झालेल्या रुग्णांची रुग्णालयात जाऊन भेट घेणे, मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाबाबत जनजागृती आणि प्रसिध्दी करणे, जिल्ह्यातील आपत्तीच्या ठिकाणी भेटी देणे तसेच मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षामार्फत अर्थसहाय्य देण्याकरिता आजारांचे पुनर्विलोकन करणे व अर्थसाहाय्याची रक्कम नव्याने निर्धारित करणे याकरिता राज्यातील तज्ञ डॉक्टरांची समिती स्थापन करण्यात आली आहे. यामुळे अर्थसहाय्य देण्यात येणाऱ्या आजारांच्या संख्येत वाढ करण्यात येणार असून उपचारांचा खर्च दिवसेंदिवस वाढत असल्याने अर्थसाहाय्याच्या रकमेचा देखील समितीमार्फत आढावा घेण्यात येणार असल्याचे श्री. नाईक यांनी सांगितले.

मुख्यमंत्री कार्यालयातील मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षा कडून अनेक दुर्धर आजारांवरील उपचारांसाठी येणाऱ्या खर्चाकरीता रुग्णांना आर्थिक सहाय्य केले जाते. तसेच आपत्ती प्रसंगीही आर्थिक मदत देण्यात येते. या अनुषंगाने मदत मिळविण्यासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षामध्ये असंख्य अर्ज प्राप्त होतात. रुग्णांना अधिक सोयीस्कर सेवा उपलब्ध करून देण्यासाठी धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष ऑनलाईन प्रणाली (चॅरिटी पोर्टल) आणि मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष ऑनलाईन प्रणाली (सीएमआरएफ पोर्टल) एकत्रित जोडण्यात येणार आहेत. सद्याच्या प्रचलित कार्यपद्धतीप्रमाणे रुग्णाला दिला जाणारा एओ क्रमांक आणि एम क्रमांक एकत्र करण्यात येणार आहे. या सुविधेमुळे निधीच्या अर्जाची प्रक्रिया अधिक गतिशील, सोपी होणार आहे. मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षाने आतापर्यंत राज्यातील हजारो गरजू रुग्णांना जीवनदान दिले आहे. दुर्धर आणि महागड्या आजारांवरील उपचारांसाठी आर्थिक सहाय्य मिळाल्याने अनेक कुटुंबांना आधार मिळाला आहे. राज्य शासनाच्या या उपक्रमामुळे राज्यातील आरोग्यसेवा अधिक सक्षम आणि लोकाभिमुख होईल, अशी अपेक्षा व्यक्त करत असताना कक्षाच्या माध्यमातून देण्यात येणाऱ्या सुविधांचा गरजू रुग्णांनी अधिकाधिक प्रमाणात लाभ घ्यावा, असे आवाहन श्री. नाईक यांनी केले आहे.

## महत्त्वाचे...

### सैफ अली खान हल्ला प्रकरणातील आरोपी मोहम्मद शहजाद याला २९ जानेवारीपर्यंत पोलिस कोठडी




दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** बॉलिवूड अभिनेता सैफ हल्ला प्रकरणातील आरोपीच्या पोलिस कोठडीत वाढ करण्यात आली आहे. आरोपीच्या पोलिस कोठडीत पाच दिवसांची वाढ करण्यात आली आहे. आरोपीला २९ जानेवारीपर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे. सैफ अली खान हल्ला प्रकरणातील आरोपीला १९ जानेवारीला अटक करण्यात आली होती. त्यानंतर त्याला पाच दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात आली होती. २४ जानेवारीला आरोपीला पुन्हा न्यायालयात हजर करण्यात आलं, त्यानंतर त्याला आणखी पाच दिवसांची कोठडी सुनावण्यात आली आहे.

### लोहारा येथे वासराचा बिबट्याने पाडला फडशा; शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण



दैनिक आपला विदर्भ

**जळगाव/प्रतिनिधी :** पाचोरा तालुक्यातील कासमपुरा शिवारालगत असलेल्या लोहारा येथील शेतकरी उस्मानखा सुलेमान खान यांच्या बांधलेल्या गुरातील दोन वर्षाच्या वासरावर बिबट्याने हल्ला करून फडशा पाडल्याची घटना उघडकीस आली आहे.

सदर शेतकऱ्याचे लोहारा शिवारात गट नं.-२१६ शेत असून गुरांचा चाऱ्याचा प्रश्र्न व खर्च कमी व्हावा यासाठी शेतकरी हा एक महिन्यापासून एका बैल जोडीसह दुग्ध व्यवसायाची चार जनावरे अश्यांची पालन पोषण कामी कपाशी पिकात चरण्यासाठी बांधत होता. यातील दोन वर्ष वयाच्या वासराचा बिबट्याने फडशा पाडला ही घटना त्यांनी वनविभागास कळविल्याने वनविभागाचे वनपाल प्रकाश देवरे ,वनरक्षक गजानन आढावणे यांकडून पंचनामा करण्यात आलेला असून या शिवारात बिबट्याचे आपल्या पिल्लांसह मुक्त संचार बघायला मिळतो पण या घटनेने शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून खरीप पिकांची शेतकऱ्यांनी लागवड मोठ्या प्रमाणात केलेली असल्याने त्याचा बंदोबस्तही होणे गरजेचे असल्याचे बोलले जात आहे.

### बाजारात लिंबाची आवक कमी झाल्याने भाव वाढले



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :**नवी मुंबईच्या एपीएमसी बाजारात लिंबाचे भाव हे गगनाला भिडले आहेत. बाजार समितीमध्ये लिंबाची आवक कमी होत असल्याने भाव वाढले आहेत. सध्या लिंबाच्या एका गोणीमागे ३०० रुपये विक्री होते. दरम्यान भाव वाढत असल्याने ग्राहकांचा चांगला प्रतिसाद मिळत नाही आहे, त्यामुळे व्यापारी चांगलेच संकटात सापडले आहेत. बाजारात परराज्यातून लिंबू येत असल्याने बदलत्या हवामानाचा परिणाम झाला आहे त्यामुळे आवक कमी होत आहे. पुढील काही दिवस अशीच परिस्थिती असणार असल्याचं व्यापाऱ्यांनी म्हटलं आहे.

### सिने अभिनेत्री यामी गौतम हिने दिली नवी मुंबईतील घर विक्री-खरेदी प्रदर्शनाला भेट



दैनिक आपला विदर्भ

**नवी मुंबई/प्रतिनिधी :** नवी मुंबईत वाशीमध्ये नवी मुंबई आणि रायगड बांधकाम व्यावसायिकांच्या वतीने प्रॉपर्टी विक्री आणि प्रदर्शन भरविण्यात आले होते. सकाळपासून या ठिकाणी अनेक मान्यवरांनी भेटी दिल्या. यासोबत सिने अभिनेत्री यामी गौतमी हिने देखील या प्रदर्शनाला भेट दिली. यावेळी तिने नवी मुंबई खूप सुंदर शहर असल्याचे सांगून या ठिकाणी नागरिकांचा प्रतिसाद पाहून आपण भारावून गेल्याचे सांगितले.

## राजपाल यादवच्या वडिलांच निधन, दिल्लीतील एम्समध्ये सुरु होते उपचार..

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** चित्रपट अभिनेता राजपाल यादवचे वडील नौरंग यादवचं निधन झालं आहे. अभिनेत्याच्या वडिलांना दिल्ली एम्समध्ये दाखल करण्यात आलं होतं. ते काही काळापासून आजारी असल्याचं सांगण्यात येत आहे. त्यांना दोन दिवसांपूर्वीच दिल्लीतील एम्समध्ये दाखल केलं गेलं होतं. वडिलांची प्रकृती बिघडल्यानंतर राजपाल काल २३ जानेवारी रोजी थायलंडहून दिल्लीला पोहोचला. आज २४ जानेवारी रोजी त्याच्या वडिलांचं निधन झालं आहे. दरम्यान राजपाल यादवच्या वडिलांचा अंतिम संस्कार शाहजहांपूरमध्ये केला जाणार आहे. दरम्यान २०२४ मध्ये राजपाल यादवची मालमत्ताही कर्ज न फेडल्यामुळे बँकेनं जप्त केली होती. २०१२ मध्ये, अभिनेत्यानं बँक ऑफ इंडियाकडून ५ कोटी रुपयांचे कर्ज घेतलं होतं. जे तो परतफेड करू शकलेला नाही. या कर्जाची हमी म्हणून त्याची शाहजहांपूरमधील मालमत्ता जप्त केली गेली होती.



राजपाल यादवला धमकीचा ईमेल : दरम्यान राजपाल यादवला काही दिवसापूर्वी जीवे मारण्याची धमकी मिळाली. यानंतर तो खूप चर्चेत आला होता. या अभिनेत्या व्यतिरिक्त कॉमेडियन कपिल शर्मा, सुगंधा मिश्रा आणि रेमो डिसूझा यांनाही धमकीचे ईमेल आले आहेत. या सेलिब्रिटींना मिळालेल्या ईमेलमध्ये म्हटलं गेलं आहे, 'आम्ही तुमच्या हालचालींवर बारकाईनं लक्ष ठेवून आहोत. आम्हाला वाटते की एक संवेदनशील बाब तुमच्या लक्षात आणून देणे महत्त्वाची आहे. हा काही प्रसिद्धीचा स्टंट नसून तुम्हाला अस्वस्थ करण्याचा प्रयत्न नाही. आम्ही विनंती करतो की तुम्ही हा संदेश गांभीर्यानं घ्या आणि याबद्दल गोपनीयता ठेवा.'


राजपाल यादवचा ऑडिओ : राजपाल यादवचा एक ऑडिओ जारी केला गेला आहे. यामध्ये तो म्हणत आहे की, ''मी आंबोली पोलीस स्टेशन आणि सायबर क्राईम यांना धमकीबद्दल कळवलं आहे. मी याबद्दल कोणाशीही बोललो नाही. मी एक अभिनेता आहे, मी अभिनय करतो. मी माझ्या कामाद्वारे सर्व वयोगटातील, तरुण आणि वृद्धांचे मनोरंजन करण्याचा प्रयत्न करत असतो. मला त्यांना आनंदी ठेवण्याची इच्छा असते. मला यापेक्षा जास्त काही सांगायचं नाही. आता याप्रकरणी कोणी काहीही म्हणो, एजन्सी बोलण्यास सक्षम आहेत. आता याबद्दल ते काही सांगू शकतात. माझ्याकडे आता याप्रकरणी माहिती नाही. मला मिळालेली माहिती मी दिली आहे.'' दरम्यान अंबोली पोलिस स्टेशन आणि सायबर गुन्हे विभागात याप्रकरणी तक्रार दाखल केली गेली आहे.

## पुण्यात बड्या नेत्याच्या मुलाकडून तरुणाला भररस्त्यात मारहाण

**पुणे/प्रतिनिधी :** पुण्याचे माजी उपमहापौर आणि काँग्रेसचे नेते आबा बागूल यांच्या मुलाने एका तरुणाला भररस्त्यात मारहाण केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. ट्रॅफिकमधून दुचाकी चालवत असताना कारला धक्का लागला, या कारणातून आबा बागूल यांचा मुलगा हेमंत बागूल याने या तरुणाला मारहाण केली आहे. प्रकरणी तरुणाने बंडगार्डन पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. यानंतर हेमंत बागूल यानेही तक्रारदार तरुणाविरोधात तक्रार दाखल केली आहे.

## जिल्ह्यातील १०३ गावात दूषित पाणी; ग्रामपंचायतींना उपाययोजना करण्याची सूचना



दैनिक आपला विदर्भ

**धुळे/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील जवळपास १०३ गावांत दूषित पाणी पुरवठा होत असल्याचे समोर आले आहे. या दूषीत पाण्यामुळे गावांमध्ये आजार पसरण्याचा धोका निर्माण झाला आहे. तर शेगाव तालुक्यातील ५ ते ६ गावामधील पाणी दूषित झाल्याने नागरिकांना केस गळतीचा त्रास होत असल्याची शंका व्यक्त केली जात होती. तर आता २ हजार १०२ पाणी नमुन्यांची तपासणी करण्यात आली होती. अनेक गावांमध्ये आजही दूषित पाणीपुरवठा होत आहे. प्रत्येक गावास शुद्ध पाणीपुरवठा करणे अद्यापही शक्य झालेले नाही. बुलढाणा जिल्ह्यात काही गावात दूषित पाणीपुरवठा होत आहे. डिसेंबर महिन्यात जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा आणि भूजल सर्वेक्षण विभागाकडून जिल्ह्यातील विविध गावांमधील २१०२ पाण्याचे नमुने गोळ्या करण्यात आले होते. प्रयोगशाळेत त्याची तपासणी करण्यात आली.

या तपासणीमध्ये काही गावांतील पाणी नमुने दूषित असल्याचे आढळून आले आहे. हे पाणी पिण्यायोग्य नसल्याचे आढळून आले. या विभागाकडून दर महिन्याला जिल्ह्यातील ठिकठिकाणच्या पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांतील नमुने घेतले जातात. या पाण्याची प्रयोगशाळेत जैविक तपासणी करण्यात येते. या तपासणीत दरवेळी काही गावांतील पाणी नमुने दूषित असल्याचे आढळून येते. त्यानंतर पाणी शुद्धीकरणासाठी उपाययोजना राबविण्याच्या सूचना आरोग्य विभागाकडून दिल्या जातात. परंतु, आजही जिल्ह्यात शंभर टक्के शुद्ध पाणीपुरवठा होत नाही. या पाणी स्त्रोतांतील पाणी दूषित असेल तर येथे उपाययोजना केल्या जातात. मात्र, त्यानंतर या स्त्रोताद्वारे नियमित शुद्ध पाण्याचा पुरवठा होईल, यासाठी काळजी घेतली जात नाही. त्यामुळे या स्त्रोतांतील पाणी पुन्हा दूषित होत असल्याचा अनुभव येत आहे. पावसाळ्याच्या दिवसांत दूषित पाणी पिल्याने साथीचे अनेक रोग पसरण्याची भिती असते. याआधीही असे प्रकार घडले आहेत. या वेळीही जिल्ह्यातील १०३ गावांतील पाण्याचे नमुने दूषित आढळले आहेत. या वेळी २ हजार १०२ पाणी नमुन्यांची तपासणी करण्यात आले होती.

## गाडीतील साहित्य विक्री करण्याच्या उद्देशाने केलेल्या खुनाच्या गुन्ह्यातील आरोपींना पोलिसांनी २४ तासात केले जेरबंद

दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** छत्रपती संभाजीनगर शहरापासून जवळ असलेल्या आडगाव शिवारमध्ये सोलापूर धुळे हायवे वर एका लोखंडी पाईपने भरलेल्या ट्रकमध्ये विजय राऊत या वक्तीचा मृतदेह सापडला होता. मृतदेह सापडताच स्थानिक गुन्हे शाखेने अवघ्या चोवीस तासातच आरोपीचा छडा लावत त्यांना बेड्या ठोकल्या आहेत. गणेश वसंत पवार,गणेश गजानन कुटे व ज्ञानेश्र्वर गणेश घायाळ अशी या आरोपीचे नावे आहेत. चिकलठाणा पोलीस स्टेशनच्या हद्दीत एका लोखंडी पाईपने भरलेला ट्रकमध्ये अहिल्यानगर येथे राहणाऱ्या विजय मुरलीधर राऊत या व्यक्तीचा मृतदेह ट्रकच्या केबिन मध्ये आढळला होता. या घटनेची चिकलठाण पोलिसांत नोंद करण्यात आली होती, तर





स्थानिक गुन्हे शाखेने त्यांच्या गोपनीय बातमीदार व तांत्रिक माहितीवरून त्यांना बातमी मिळाली की गणेश वसंत पवार रा.सुलतानपूर ता.लोणार जि. बुलढाणा यांने त्याचे साथीदारासह विजयचा खून केला आहे. मिळालेल्या गुप्त बातमीवरून पथकाने सुलतानपूर, लोणार, मेहकर येथे जावून गणेश वसंत पवार वय ३७ याचा सतत चोवीस तास शोध घेतला असता तो मिळून आला त्यास शिताफीने ताब्यात घेवून गुन्ह्याचे अनुषंगाने विचारपूस केली असता त्यांने सदरचा गुन्हा त्याचे साथीदार च्या मदतीने केला असल्याचे निष्पन्न झाले गणेश गजानन कुटे वय २९ रा. सुलतानपूर तसेच ज्ञानेश्र्वर गणेश घायाळ वय २७ रा. गायखेडा ता. लोणार.तर या आरोपींना ह्या गुन्ह्याच्या अनुषंगाने विचारपूस केली असता त्यांनीच खून गुन्हा केल्याची कबुली दिली असून, मयताची गाडी व गाडीतील लोखंडी पाईप असे साहित्य चोरी करून विक्री करण्यासाठी विजयच्या डोक्यात पाना मारून खून केला व बॉडी केबीन मध्ये शिटच्या बॉक्स मध्ये लपवून ठेवली. तर या आरोपींनी चोरी केलेला संपूर्ण मुद्देमाल घेण्यास ग्राहक मिळत नसल्याने व बॉडीचा वास सुटल्याने गाडी, व मुद्देमाल, मृतदेह तिथेच सोडून पळ काढला. तर या तिन्ही आरोपींना पोलीस स्टेशन चिकलठाणा यांच्या ताब्यात पुढील तपासकामी हजर करण्यात आले आहे.

## विविध वृत्त...

### केसगळती होत असलेल्या माटरगावातील पाणी वापरण्यास अपायकारक; उपाययोजना करण्याच्या आरोग्य विभागाच्या सूचना

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव तालुक्यातील ११ आणि नांदुरा तालुक्यातील १ अशा १२ गावांमध्ये मागील महिनाभरापासून काही नागरिकांचे केस गळती होऊन टक्कल होण्याच्या घटना समोर आल्या आहेत. दरम्यान शेगाव तालुक्यातील माटरगाव या गावात सध्या १९ रुग्ण केस गळतीचे असून आरोग्य विभागाने या गावाला होणारा पाणीपुरवठा स्त्रोताच्या पाण्याचे नमुने घेऊन तपासणी केली असता सदर पाणी हे पिण्यास आणि वापरण्यास अयोग्य असल्याचा अहवाल देण्यात आला असून याबाबतची माहिती ग्रामपंचायतला लेखी पत्राद्वारे कळविण्यात आली आहे. आपल्या कार्यक्षेत्रातील खालील पाणी नमुने रासायनिक दृष्ट्या अयोग्य असल्याचे आढळून आलेले आहेत सदर पाणी पिणे तथा वापरणे आरोग्याचे दृष्टीने अपायकारक आहे, तरी सदर स्त्रोताजवळ बोर्ड लावून तसेच दवंडीद्वारे नागरिकांस अवगत करावे असे कळविण्यात आले आहे. यामुळे खळबळ उडाली असून १२ हजार लोकसंख्येच्या या गावात शुद्ध पिण्याच्या पाण्याचे नियोजन केले जात असल्याची माहिती ग्रामविकास अधिकारी आर.आर. सावरकर यांनी बोलताना दिली आहे.

### मदत व पुनर्वसन मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री मकरंद पाटील यांचा जिल्हा दौरा

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** राज्याचे मदत व पुनर्वसन तथा जिल्ह्याचे पालकमंत्री हे शनिवार, रविवार दि. २५ व २६ जानेवारी २०२५ रोजी बुलढाणा जिल्हा दौऱ्यावर येत आहेत.



त्यांच्या दौरा कार्यक्रमानुसार शनिवार दि. २५ जानेवारी २०२५ रोजी छत्रपती संभाजीनगर येथून सकाळी ११.४५ वाजता सिंदखेडराज येथे आगमन व जिजाऊ मॉ साहेब जन्मस्थळी अभिवादन आणि जिजाऊ सृष्टीस भेट. दुपारी १२.१५ वाजता ॲड. नाझेर काझी(जिल्हाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष) यांच्या निवासस्थानी भेट आणि राखीव. दुपारी १२.४५ वाजता देऊळगाव राजाकडे प्रयाण. दुपारी १ वाजता देऊळगाव राजा येथे आगमन व आमदार मनोज कायंदे यांच्या निवासस्थानी राखीव. दुपारी १.४५ वाजता बुलढाणाकडे प्रयाण. दुपारी ३ वाजता शासकीय विश्रामगृह, बुलढाणा येथे आगमन व राखीव. दुपारी ३.३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय बुलढाणा येथे जिल्ह्यातील सर्व प्रशासकीय विभागांची आढावा बैठक. सोईनुसार शासकीय विश्रामगृह, बुलढाणा येथे आगमन व राखीव.

रविवार दि. २६ जानेवारी रोजी सकाळी ९.१० वाजता शासकीय विश्रामगृह, बुलढाणा येथून पोलिस कवायत मैदानाकडे प्रयाण व सकाळी ९.१५ वाजता शासकीय ध्वजारोहण कार्यक्रमास उपस्थिती. सोईनुसार शासकीय विश्रामगृह, बुलढाणाकडे प्रयाण व राखीव. दुपारी १२ वाजता राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, बुलढाणा पक्ष कार्यालय येथील बैठकीस उपस्थिती. दुपारी १.३० वाजता बुलढाणा येथून शेगांवकडे(संत नगरी) प्रयाण. दुपारी २.३० वाजता शेगांव येथे आगमन व श्री संत गजानन महाराज दर्शन. दुपारी ३ वाजता मुंबईकडे प्रयाण.

### एसटी दरवाढीवरुन माजी मंत्री यशोमती ठाकूर यांची राज्य शासनावर टिका



दैनिक आपला विदर्भ

**अमरावती/प्रतिनिधी :** सोयाबीन व तुरीला भाव न देणाऱ्या राज्य सरकारने एसटीची दरवाढ मात्र केली, एसटी दरवाढीने सर्वसामान्यांच्या पोटाला चिमटा बसला आहे, त्याबद्दल मुख्यमंत्र्यांचे अभिनंदन केले पाहिजे, अशा शब्दात माजी मंत्री, तथा काँग्रेसच्या नेत्या यशोमती ठाकूर यांनी सरकार विरोधात आपला संताप व्यक्त केला आहे. सर्वसामान्यांचे पोटावर कशी लाथ मारावी हे आताच्या सरकारकडून शिकले पाहिजे. राज्यात कुठल्याही नियोजनाशिवाय सुरू करण्यात आलेल्या योजनांचा भुर्दंड तिजोरीवर बसत असून नागरिकांकडून वसूल केला जात आहे असेही त्या म्हणाल्या आहेत. राज्य शासनाने एसटीची दरवाढ जाहीर केले असून त्या विरोधात राज्यातील नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. चुकीच्या पद्धतीने नियोजन करून सुरू करण्यात आलेल्या योजनांमुळे राज्याच्या तिजोरीवर जो भुर्दंड निर्माण होत आहे तो आता सर्वसामान्यांच्या खिशातून वसूल केल्या जाणार आहे हे च एसटीच्या भाडेवाडीच्या निमित्त राज्य सरकारने स्पष्ट केले आहे.

# महसूल क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाचा जिल्हाधिकारी यांचे हस्ते शुभारंभ

## क्रीडा स्पर्धातून अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या कलागुणांना वाव मिळेल- डॉ. किरण पाटील

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** महसूल विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना विरंगुळा मिळावा तसेच शारिरीक तंदुरुस्तीसह त्यांच्यातील कला गुणांना आपल्या व्यस्त कामामुळे समाजासमोर आणता येत नाही. क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रमाच्या माध्यमातुन त्यांना या कला गुणांना समोर आणण्याची संधी मिळेल, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले.

महसूल विभागाच्यावतीने दोन दिवशीय महसूल क्रिडा व सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन जिल्हा क्रिडा संकुल येथे करण्यात आले. या महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी अपर जिल्हाधिकारी सदाशिव शेलार, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. जयश्री ठाकरे, उपजिल्हाधिकारी महसूल समाधान गायकवाड, उपजिल्हाधिकारी भुसंपादन



राजेंद्र पोळ, सुरेश थोरात, अजिंक्य गोडगे, उपजिल्हाधिकारी निवडणूक सुहासिनी गोणेवार, उपविभागीय अधिकारी संजय खडसे, शैलेश काळे, शरद पाटील, जिल्हा क्रीडा अधिकारी बी.एस. महानकर तसेच सर्व तहसिलदार, महसूल विभागाचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ. पाटील म्हणाले की, महसूल प्रशासन शासनाचा कणा आहे. शासनाच्या सर्व प्रकारच्या जबाबदाऱ्या सांभाळण्याचे व नागरिकांच्या समस्या व अडीअडचणींचे निराकरण करण्याची जबाबदारी महसूल कर्मचाऱ्यांवर असते. अशा व्यस्त व ताणतणावाच्या कामातून विरंगुळा मिळावा, शारिरीक तंदुरुस्तीसह कला गुणांना वाव मिळण्यासाठी क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा त्यांच्यासाठी महत्वाची ठरेल. कर्मचारी खेळाडूंनी आपल्या खेळाचे कौशल्य दाखवून जिल्ह्याचे नाव विभाग व राज्यस्तरावर नावलौकिक करावे, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.


अपर जिल्हाधिकारी श्री. शेलार म्हणाले की, क्रिडा स्पर्धेमध्ये सहभाग घेतल्यास शारिरीक तंदुरुस्ती बरोबर मानसिक तंदुरुस्ती मिळते. त्यामुळे प्रत्येक कर्मचाऱ्यांनी कुठल्याही प्रकारच्या खेळामध्ये सहभाग नोंदवून आपल्या सहकारांनाही स्पर्धेत सहभागी होण्यासाठी प्रेरित करावे, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त मतदार दिनाची शपथ घेण्यात आली. त्यानंतर महोत्सवाचे उद्घाटन दिप प्रज्वलनाने करण्यात आले. जिल्ह्यातील महसूल उपविभागनिहाय पथकाव्दारे शानदार पथसंचलन करण्यात आले. त्यानंतर स्पर्धेची सुरुवात डॉ. पाटील यांनी क्रिकेट खेळून केली. यावेळी महसूल विभागातील अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपविभागीय अधिकारी संजय खडसे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविकेतून जिल्हा महसूल क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेची रुपरेषा व महत्त्व विशद केले. संचालन तहसिलदार वृशाली केसकर व ग्रामविकास अधिकारी शिवानंद वाकदकर यांनी केले.

या क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवात जिल्हाधिकारी कार्यालयासह उपविभागीय कार्यालय, बुलढाणा, मलकापूर, सिंदखेडराजा, मेहकर, खामगाव, जळगाव जामोद या महसूल विभागातील अधिकारी कर्मचारी यांनी सहभाग घेतला होता. यामध्ये क्रिकेट, कबड्डी, थ्रो-बॉल, खो-खो, रिंग टेनिस, व्हॉलिबॉल, बॅडमिंटन, टेबल टेनिस, बुध्दीबळ, कॅरम या खेळाचा व सांस्कृतिक कार्यक्रमाचा सहभाग असणार आहे.

## गुजरातच्या भंगार व्यापाऱ्याच अपहरण करून ५० लाखांची खंडणी मागणाऱ्या चौघांच्या पोलिसांनी आवळल्या मुसक्या





दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** बुलढाणा जिल्ह्यातील मलकापूर एमआयडीसी क्षेत्रात एका कंपनीतील भंगार सामान घेण्यासाठी गुजरात येथून आलेल्या अली भाई अकबर भाई या व्यापाऱ्याचं एमआयडीसी परिसरातून अपहरण करून ५० लाखांची खंडणी मागणाऱ्या छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील चार आरोपींना पोलिसांनी संभाजीनगर जिल्ह्यात जाऊन अटक केली आहे. या व्यापाऱ्याची सुखरूप सुटका केली आहे. गुजरात मधून अली भाई अकबर भाई हे मलकापूर औद्योगिक क्षेत्रात भंगार सामान घेण्यासाठी आले होते. यावेळी एका कारमधून त्यांनी या व्यापाऱ्याचे अपहरण करून संभाजीनगर जिल्ह्यातील सिल्लोड तालुक्यातील अंभई येथे डांबून ठेवलं होतं. पोलिसांनी २४ तासातच मोबाईल लोकेशन वरून या ठिकाणी धाड टाकून चौघांना अटक केली आहे व व्यापाऱ्याची सुटका केली आहे. व्यापाऱ्याच्या तक्रारीवरून पोलिसांनी चौघांना अटक केली आहे. आज त्यांना न्यायालयासमोर हजर करण्यात आले आहे. न्यायालयाने निकाल सध्या राखीव ठेवला आहे.

### प्रधानमंत्री आरोग्य योजना व महात्मा ज्योतिबा फुले आरोग्य योजनेचे आरोग्य मित्र संपावर जाणार

**बुलडाणा/प्रतिनिधी :** आरोग्य मित्रांना दरमहा २६ हजार रुपये वेतन देण्यात यावे, किमान वेतन कायद्यानुसार विशेष भत्ता तथा महागाई भत्ता देण्यात यावा तसेच वेतनात दरवर्षी दहा टक्क्यांनी वाढ करण्यात यावी या मागणीसाठी आरोग्य मित्र संपाचे हत्यार उपसणार आहेत. महाराष्ट्रात मोफत आरोग्य सेवांसाठी अनेक योजना आहेत. यामध्ये महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना आणि आयुष्मान भारत – प्रधानमंत्री जन आरोग्य योजना यांचा समावेश आहे. या योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांना मोफत वैद्यकीय सेवा दिल्या जातात. या योजनेची माहिती देण्यासाठी तसेच रुग्णालयात आलेल्या रुग्णांची नोंद करण्यासाठी आरोग्य मित्र काम करत असतात. मात्र आरोग्य मित्रांना त्या कामाचा मोबदला कमी मिळत असल्याने महाराष्ट्र आरोग्य मित्र कर्मचारी संघटनेच्या वतीने मागण्या करण्यात आल्या आहेत मागण्या पूर्ण न झाल्यास दिनांक १२ फेब्रुवारी २०२५ पासून जिल्ह्यासह राज्यातील सर्व 'आरोग्य मित्र' संपावर जाणार असल्याचा असल्याचे आरोग्य मित्रांनी सांगितले आहे.

### बंद खोलीत तुमची अजितदादांबरोबर काय चर्चा झाली?

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** ज्येष्ठ नेते शरद पवार आणि उपमुख्यमंत्री अजित पवार वसंतदादा साखर उद्योगाच्या एका बैठकीच्या निमित्ताने गुरुवारी पुण्यात एकत्र आलेले होते. विशेष म्हणजे काका पुतण्यांमध्ये बंद खोलीत जवळपास अर्धा तास चर्चा झाल्याने राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा होती. याचविषयी शरद पवार यांना आज कोल्हापूरच्या पत्रकार परिषदेत विचारण्यात आले.

अजित पवार आणि तुमची बंद खोलीत चर्चा झाली. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाबद्दल आणि एकत्र येण्याबद्दल काही चर्चा झाली का? असे पत्रकारांशी शरद पवार यांना विचारले. त्यावर एका प्रकल्पाची चर्चा केली, असे सांगत त्यांनी प्रकल्पाची संपूर्ण माहिती सांगितली.पवार म्हणाले, राष्ट्रवादीबाबत कोणतीही चर्चा अजिबात झाली नाही. आमच्यात एका प्रकल्पाबाबत चर्चा झाली. कोल्हापूरचे उद्योजक नलावडे यांच्याकडे एक संस्थेचे अध्यक्षपद आहे. मागे वसंतदादा राज्याचे मुख्यमंत्री असताना त्यांनी साखर धंद्यातल्या सगळ्यांना एकत्र बोलवले. साखर कारखान्यांना लागणारी मशिनरी आपण का बनवायची नाही? असा विचार करून त्यांनी यासाठी एक कंपनी काढली. त्या कंपनीचे गडहिंग्लजचे नलावडे हे अध्यक्षष्ठ तिथे गेल्या तीन वर्षापासून कारखाना बंद आहे, कामगारांचे वेतन नाही. याचसंदर्भाने आम्ही चौघांनी बसून सविस्तर चर्चा केली, असे पवार यांनी सांगितले.

## अमरावतीत बांगलादेशी रोहिंग्यांना आश्रय दिला जातो- अनिल बोंडे



दैनिक आपला विदर्भ

**अमरावती/प्रतिनिधी :** अमरावतीत बांगलादेशी रोहिंग यांना आश्रय दिला जातो, असा खळबळजनक आरोप भाजपचे खासदार अनिल बोंडे यांनी केला आहे. अमरावती म्हणजे प्रयोगशाळा करून टाकली आहे. मागे ज्यावेळी दंगलीची परिस्थिती निर्माण झाली होती त्यावेळी इथे बांगलादेशी यांना आश्रय दिला जात असल्याचा देखील स्पष्ट केलं होतं. पोलीस आयुक्तांना या संदर्भात पत्र देत कारवाई करण्याची मागणी केली असल्याची माहिती डॉ.बोंडे यांनी दिली आहे. अमरावतीत आश्रयित असलेले बांगलादेशी रोहिंग्या की पश्रि्चम बंगालचे रहिवासी याबद्दल संभ्रम निर्माण झाला होता. भाजपचे नेते किरीट सोमय्या यांनी बनावट जन्म दाखल्याच प्रकरण बाहेर काढलं. त्यावेळी सर्वजण जागरूक झाले आहेत. औद्योगिक वसाहतीत बांगला बोलणारे नागरिक आहेत. त्यामधील अनेक जणांची कागदपत्र ही संशयास्पद आहेत. ते बांगलादेशातून आले असल्याचे महाराष्ट्रात आता जाहीर झालं आहे. सैफ अली खान फतोडी याच्यावर हल्ला करणारा देखील बांगलादेशी आहे. त्यामुळे या बांगलादेशीवर कडक कारवाई करण्याची मोहीम सरकारने हाती घेतली आहे असे देखील बोंडे यांनी स्पष्ट केले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात पोलिसांनी या प्रकरणात कठोर पाऊल उचलली आहेत त्यासाठी पोलीस खात्याचं मनःपूर्वक अभिनंदन करतो असं डॉ.अनिल बोंडे म्हणाले आहेत. तर दुसरीकडे औद्योगिक वसाहतीत असलेल्या विविध कारखान्यांमध्ये काम करणाऱ्या व्यापाऱ्यांनी त्यांनी आवाहन केले की, कामावर कामगार ठेवताना त्यांची पूर्ण खातर जमा करावी. भारतात राहून हे कुणाच्यातरी जीवावर उठतील. त्यामुळे त्यांना इथून बाहेर हाकलण्याची वेळ आली असल्याचा आक्रमक पवित्रा देखील त्यांनी घेतला आहे.

## जिल्हा परिषदेचे शिक्षक पती-पत्नी निलंबित

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** मेहकर पंचायत समिती अंतर्गत विश्वी येथील जिल्हा परिषद शाळेवर कार्यरत शिक्षक गजानन सातपुते व पांगरखेड शाळेवर कार्यरत असलेल्या त्यांच्या पत्नी छाया सातपुते या दोघांनाही सेवेतून निलंबित करण्यात आले आहे.

कुटुंबातील मुलांची माहिती लपवत बनावट छोटे कुटुंब प्रतिज्ञापत्र सादर केले. त्या आधारावर या दांम्पत्याने शिक्षक पदाची सरकारी नोकरी करत पगार घेतला अशी तक्रार २८ डिसेंबर २०२३ रोजी देवेंद्र आखाडे व इतर यांनी शिक्षणाधिकारी यांच्याकडे केली होती. त्यानंतर शिक्षणाधिकारी यांनी १७ जानेवारी २०२४ च्या पत्रान्वये गटशिक्षणाधिकारी पं.स. यांच्या अध्यक्षतेखाली या प्रकरणांमध्ये चार सदस्यीय चौकशी समिती नेमली होती. त्यानंतर चौकशी समिती अध्यक्ष यांनी ३१/१०/२०२४ रोजी शिक्षण अधिकारी यांना चौकशी अहवाल सादर केला होता. गजानन नामदेव सातपुते स.अ. यांना ४ अपत्य आहे त्यातील २ अपत्य २८ मार्च २००५ नंतरचे आहेत व छाया गजानन सातपुते यांचे तीन विवाह झाले असून त्यांना ३ अपत्य आहेत त्यातील एक अपत्य २८ मार्च २००५ नंतरचे आहे. डोणगाव पोलीस स्टेशनमध्ये १ फेब्रुवारी २०२४ रोजी यांच्यावर गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल असून त्याचा अहवाल गटशिक्षण अधिकारी यांना प्राप्त झाला होता म्हणून महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ व महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम १९६७ अन्वये तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बुलढाणा यांचे आदेश क्रमांक बुजिप / साप्रवि/अस्था- ५/७२६/२०२४ गटविकास अधिकारी (उच्च श्रेणी) पंचायत समिती मेहकर महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील भाग २ नियम ३ (ब) अन्वये असणाऱ्या अधिकाराचा वापर करून गजानन नामदेव सातपुते विषय शिक्षक गणित / विज्ञान व छाया गजानन सातपुते स.अ. यांना २१ जानेवारी २०२५ पासून निलंबित केले आहे...

# बनावट दारूचा कारखाना स्थानिक गुन्हा अन्वेषण शाखेने केला उद्ध्वस्त

दैनिक आपला विदर्भ

**धुळे/प्रतिनिधी :** धुळे शहरातील १०० फुटी रोड जामचा मळा परिसरात असलेल्या सुमैया हॉलच्या पाठीमागे सुरू असलेला बनावट देशी दारूचा कारखाना असल्याची माहिती पोलिसांना मिळाल्यानंतर धुळे स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिस पथकाने सादर बनावट दारूचा कारखाना उध्वस्त केला असून तब्बल ७ लाख ३५ हजार रुपयांचा मुद्देमाल धुळे पोलिसांनी हस्तगत केला आहे.

धुळे शहरातील चाळीसगाव रोड परिसरात असलेल्या जामचा मळा भागातील सुमैया हॉलच्या पाठीमागे अवैधरित्या बनावट देशी दारूचा कारखाना सुरू असल्याची गुप्त माहिती धुळे स्थानिक गुन्हा अन्वेषण शाखेला मिळाली होती. या ठिकाणी तयार होत असलेली देशी दारू गुजरातसह अन्य ठिकाणी देखील विक्रीसाठी जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाल्यानंतर स्थानिक गुन्हा अन्वेषण शाखेने छापा टाकून कारवाई केली असून हा बनावट दारूचा कारखाना उद्ध्वस्त केला आहे.

शेख जावेद शेख मोहम्मद नामक व्यक्ती हा कारखाना चालवत असल्याची माहिती पोलिसांना मिळाल्यानंतर या ठिकाणी केलेल्या कारवाईत पोलिसांनी तब्बल ७ लाख ९५ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. या कारवाईत बनावट दारू देखील मोठ्या प्रमाणावर जप्त करण्यात आली असून दारू तयार करण्याचे साहित्य देखील पोलिसांनी ताब्यात घेतले आहे तसेच याप्रकरणी सहा जणांना ताब्यात घेण्यात आले असून



मुख्य संशयित आरोपी अद्याप फरार असल्याची माहिती पोलिस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी यावेळी दिली.